मायणी तलाव व परिसरातील गांवे व माण पूर्व भागातील १६ गावांना पिण्यासाठी व पशुधनासाठी कृष्णा नदीमधून टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी उपलब्ध करुन देण्याच्या योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांक: टंचाई २०१७/प्र.क्र.१२७/पापु १४

जी. टी. रुग्णालय इमारत संकुल, नविन इमारत ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: २७ मार्च, २०१८

वाचा :

१) जिल्हाधिकारी, सातारा यांचे पत्र क्र. रोहयो / पाणीटंचाई / कावि ४६०/ १७ दिनांक २१ जुलै, २०१७
२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांकः एससीवाय -२०१८/प्र.क्र. ३/म-७, दिनांक १७ जानेवारी, २०१८
३) शासन पत्र : क्रमांक एससीवाय -२०१८/प्र.क्र. ३/म-७, दिनांक १४ मार्च, २०१८
४) शासन शुध्दीपत्रक महसूल व वन विभाग क्रमांकः एससीवाय -२०१८/प्र.क्र. ३/म-७, दिनांक १६ मार्च, २०१८

प्रस्तावना –

मायणी तलाव व परिसरातील गांवे व माण तालुक्याच्या पूर्व भागातील १६ गावांना पिण्यासाठी व पशुधनासाठी कृष्णा नदीवरील टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी उपलब्ध करुन देऊन मायणी तलाव भरण्यासाठी रुपये ४७२.८९ लाख तसेच माण तालुक्याच्या पूर्व भागातील १६ गावांसाठी रु. ४३२.३२ लाख अशा एकूण रुपये ९०५.२१ लाख किंमतीची अंदाजपत्रके व आराखडे जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांच्या दि. २१.०७.२०१७ च्या पत्रान्वये शासनास सादर केले होते. या अंतर्गत टेंभु योजनेच्या टप्पा ३ (अ) ते घाणंद तलावावर ९०० मि.मि. व्यासाचे विमोचक व ९६० मि. लांबीच्या PSC पाईपद्वारे भिकवडी बु.|| ता. खानापुर येथील नाल्यामध्ये १,५६८ दलघमी (५५.३९ दलघफु) पाणी सोडून मायणी तलावामध्ये दोन टप्प्यामध्ये पाणी देणे तसेच माण तालुक्यातील पूर्व भागातील १६ गावांसाठी टेंभु योजनेच्या आटपाडी कालवा कि.मी. क्र. १३ मधून १००० मि.मि. व्यासाच्या ४ कि.मी.

लांबीच्या PSC पाईपलाईनद्वारे कापसेवाडी येथील नाल्यामध्ये पाणी सोडणे या कामाचा समावेश असलेल्या प्रस्तावास मा. मंत्री, मदत व पुनर्वसन व मा. मुख्यमंत्री महोदयांनी एक विशेष बाब म्हणून मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने महसूल व वन विभागाने त्यांच्या दि. १७ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये टंचाई अंतर्गत रुपये ९०५.२१ लाख इतका निधी जलसंपदा विभागास यापूर्वीच उपलब्ध करुन दिला आहे.

सदर योजना ही मायणी तलावाच्या परिसरातील गावे व माण तालुक्याच्या पूर्व भागातील १६ गावांना पिण्याच्या पाण्यासाठी व पशुधनासाठी लागणा-या पाण्यासंदर्भात असल्याने प्रस्तुत प्रस्तावास पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने प्रशासकीय मान्यता द्यावी, असा निर्णय मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यानुसार महसूल व वन विभागाने दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी शासन शुध्दीपत्रक निर्गमित केले आहे. त्यास अनुसरुन सदर योजनेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, मायणी तलाव व परिसरातील गांवे व माण तालुक्याच्या पूर्व भागातील १६ गावांना पिण्याच्या पाण्यासाठी व पशुधनासाठी कृष्णा नदीमधून टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी उपलब्ध करुन देऊन मायणी तलाव भरण्यासाठी रुपये ४७२.८९ लाख तसेच माण तालुक्याच्या पूर्व भागातील १६ गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी रु. ४३२.३२ लाख अशा एकूण रुपये ९०५.२१ लाख (रुपये नऊ कोटी पाच लाख एकवीस हजार फक्त) किंमतीची अंदाजपत्रके व आराखडे यांस खालील अटींच्या अधिन राहून टंचाई अंतर्गत एक विशेष बाब म्हणून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, सातारा यांनी मायणी तलाव परिसरातील गावे व माण तालुक्यातील १६ गावे या क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्व प्रथम घोषित करावे.
२) योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. जादा किंमतीच्या निविदा स्वीकृत करु नयेत.
३) योजनेचे काम प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीतच पूर्ण करणे आवश्यक आहे. योजना सुधारित करता येणार नाही.
४) योजनेची किंमत वाढल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही व अशी योजना कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यास पात्र राहील.
५) सदर योजनेचे काम तातडीने पूर्ण करावे, जेणेकरुन या योजनेचा उपयोग सन २०१८ च्या पाणी टंचाई कालावधीत करता येणे शक्य आहे.

६) सदर योजना जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात यावी तसेच योजना कार्यान्वित झाल्यानंतर त्याची देखभाल दुरुस्ती जलसंपदा विभागानेच करावी. यासाठी पुन्हा स्वतंत्रपणे टंचाई अंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

७) प्रस्तुत योजना टंचाई अंतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी व पशुधनासाठी लागणारे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी तयार करुन देण्यात आली असल्याने सदर योजनेचे पाणी त्याच कारणासाठी वापरणे आवश्यक आहे. प्रस्तुत योजनेच्या पाण्याचा वापर सिंचनासाठी अथवा अन्य कारणास्तव करता येणार नाही.

८) सदर योजनेच्या अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी. तांत्रिक मान्यता घेण्यापूर्वीच योजनेचे काम सुरु केल्यास याव्दारे देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता आपोआप रद्द होईल.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७११२३०२०९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, cn=R. B. Kumatgi
Date: 2018.03.27 18:51:39 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई

२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
६. विभागीय आयुक्त, पुणे
७. जिल्हाधिकारी, सातारा ,
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा
९. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे,
१०.अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे विभाग, सांगली
११. कार्यकारी अभियंता, टेंभु उपसा सिंचन प्रकल्प विभाग क्र. १, सांगली
१२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सांगली
१३.अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१४.उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१५.पापु १४ (निवडनस्ती)